लोकसत्ता, पुणे; शनिवार, दि. १-४-१९९५

# मोरूमामांचा कूटप्रश्न

जयंत नारळीकर

सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती रखुमाई चा पती सोयरीया...' अशा तुकारामाच्या अभंगानी मला आणि माझ्या भावाला जाग येत असे. ही माझी अगदी लहानपणची आठवण, वय वर्षे तीन-चारच्या दरम्यान. अभंग म्हणणारी आमची आई... आम्ही तिला ताई म्हणतो. ताईनेच आम्हाला संस्कृत श्लोकांची दीक्षा दिली. रामरक्षा, चर्पटपंजरिका, दशश्लोकी आणि अर्थातच 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे'पासून भगवद्‌गीता.

माझ्या आजपर्यंतच्या जीवनाचा पहिला तृतीयांश बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या शांत रम्य वातावरणात गेला. विद्यापीठाच्या गीतात म्हटल्याप्रमाणे 'मधुर मनोहर अतीव सुंदर ये सर्व विद्या की राजधानी' असे बी.एच.यू.चे त्या वेळचे चित्र होते. संस्थापक पंडित मदन मोहन मालवीय यांच्या ध्येयवादाची छाप होती आणि सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यासारखे विद्वान तत्त्ववेत्ते विद्यापीठाला कुलगुरू म्हणून लाभले होते. माझ्या वडिलांना, ते केंब्रिजमध्ये संशोधन करत असतानाच मालवीयजींनी बी.एच.यू. मध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून यायला आमंत्रण दिले होते. आधी केंब्रिज मग मालवीयजी आणि नंतर राधाकृष्णन ह्या सर्वांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव होता आणि त्या व्यक्तिमत्त्वाचा आमच्यावर.

म्हणून आमच्यावर लहानपणी जे संस्कार झाले, त्यात भारतीय आणि पाश्चात्य दोन्हीचे मिश्रण होते. ताईने नानापुराण निगमागमसंमत गोष्टी सांगाव्यात, तर वडिलांनी पी. जी. वुडहाऊस, शेरलॉक होम्सपासून काउंट ऑफ मॉण्टे ख्रिस्टो आणि बॅरन मंकहाउसनचे साहित्य पुढे करावे! पण पौर्वात्य असो वा पाश्चात्य त्या गोष्टी वाचून दाखवण्याचे काम ताईचे.

पण अशा कथाश्रवणातून आम्हाला वाचनाची गोडी लागली. शाळेत हिंदी माध्यमातून शिक्षण आणि इंग्रजीची सुरुवात तिसऱ्या इयत्तेपासून म्हणून इंग्रजीतून वाचन उशिरा सुरू झाले. पण त्या आधी मराठी आणि हिंदी पुस्तके आम्ही दोघे अधाशासारखे वाचू लागलो. हिंदीत 'चंद्रकांता' तर मराठीत चिपळूणकरांच्या 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी दोन्हीत रंगलो. यातच कुठेतरी चिमणराव आणि गुंड्याभाऊ न कळत घुसले आणि त्यांची साथ वुडहाऊसच्या बर्टी वुस्टर आणि जीव्जप्रमाणे आजपर्यंत आहे.

मला आजही विनोदी वाङ्‌मय सर्वात जास्त आवडते त्याची बिजं अशी लहानपणी रोवली गेली. लिहायला अवघड आणि वाचायला सोपे अशी उत्कृष्ट विनोदी वाङ्‌मयाची परिभाषा असावी.

पण वाचनाशिवाय म्हणजे अशा अवान्तर वाचनाशिवाय अभ्यास वेळच्या वेळी करण्याचे वळण आईवडिलांनी आम्हाला लहान वयातच लावले. शाळेत एक अभ्यासू मुलगा म्हणून माझी ख्याती होती. पहिल्या नंबराबरोबर प्रीफेक्ट किंवा मॉनिटरचे पदही मला मिळत असे. पण अशा पदामागे मान असतो. तशी जबाबदारीपण याचा अनुभव मला एका प्रसंगातून मिळाला.

शाळेचा शेवटचा तास. किंवा अलिकडच्या भाषेत पी.टी.चा असे. एक दिवस ड्रिलमास्तर आलेच नाहीत. मग तासाचे काय? एक विद्यार्थी कॉमनरूममध्ये डोकावून, विचारून आला. ड्रिलमास्तर गैरहजर आहेत अशी बातमी घेऊन आला आणि आता इथे थांबण्यात हशील नाही म्हणत आम्ही सगळे दप्तरे घेऊन घरी पळालो.

दुसऱ्या दिवशी हेडमास्तरांनी मला बोलावले. 'ड्रिलमास्तर नाहीत म्हणून तो तास मी घेणार होतो. ते म्हणाले. 'पण मी आलो तेव्हा सगळेच गायब! असे कसे झाले? त्यांनी विचारले.

'सर! मास्तर नाहीत तर क्लास नाही. शेवटचा तास म्हणून आम्ही कोणी थांबलो नाही.' मी म्हटले.

पण नकारार्थी मान हालवत हेडमास्तर म्हणाले, "इतरांबाबत मी बोलत नाही. पण प्रीफेक्ट म्हणून क्लास सोडण्याची जबाबदारी तुझी. तू वर्गशिक्षक किंवा मला न विचारता सर्वांना कसे जाऊ दिलेस? आणि त्यांनी तुला जुमानले नसले, तरी तू स्वतः शाळासोडून जाणे योग्य होते का?"

मला वाटते असे काही मोजके प्रसंग आपल्याला पुढील आयुष्यासाठी बरेच काही शिकवून जातात. आणखी एक प्रसंग - जो त्या वेळी अप्रिय वाटला, पण पुढे त्याचे महत्त्व कळले.

## स्वावलंबनाचा धडा

विष्णू दिगंबर पलुस्करांच्या पट्टशिष्यांपैकी एक.... पंडित नारायणराव व्यास माझ्या वडिलांचे समकालीन; समकालीन पण वयाने त्यांच्यापेक्षा काही वर्षांनी वडील. ते गायन कार्यक्रमांसाठी वेळोवेळी बनारसला येत आणि तेव्हा आमच्याकडे उतरत. अशाच एका ट्रिपमध्ये त्यांनी पाहिले - ही मुले मोठी झाली, तरी आईकडून पुष्कळ कामे करवून घेतात. 'ताई हे कर.... ते आण... अमुक अमुक तिथे ठेव'. आम्हाला हे सांगायची पुष्कळ सवय झाली होती. व्यासमामांनी थोडा आक्रमक पवित्रा घेतला. आम्हाला बोलावून सांगितले. "तुम्ही आता सहावी व आठवीत गेलात... मोठे झालात, स्वतःची कामे स्वतः करायला शिका. स्वावलंबन आले पाहिजे. पुढे वेगळे राहायला गेलात तर तिथे ताई मदत करायला येणार काय? आणि उच्चशिक्षणासाठी तुम्हाला दुसरीकडे जावे लागले तर? फार काय, कमीत कमी पिठलं-भात स्वतःला करता आला पाहिजे."

एरवी गप्पा मारणारे आणि इतर गवयांच्या नकला करून हसवणारे व्यासमामा त्यांनी असे बौद्धिक घेतल्यावर आम्ही दोघे हादरून गेलो. आणि त्यांनी वडिलकीच्या नात्याने आई-वडिलांचेही बौद्धिक घेतले आणि मुलांचे लाड कमी करून, त्यांना स्वावलंबी करा, म्हणून सांगितले. ह्याचा परिणाम म्हणजे आम्हाला आमची कामे आम्हीच करायची हे शिकावे लागले. अर्थात पुढे हे स्वावलंबन हिताचे ठरले पण त्यावेळी 'ही काय नसती ब्याद!' असे वाटायचे.

अभ्यासाशिवाय खेळात रस घेतला पाहिजे, हे अर्थात बौद्धिक घेऊन सांगावे लागले नाही. सुदैवाने घराच्या विस्तीर्ण आवारात बॅडमिंटन कोर्ट होते, त्यामुळे आम्ही ज्युनिअर चॅम्पियन झालो. मोठे खेळाडू टी. एन. सेठ सारखे नॅशनल चॅम्पियनदेखील आमच्या कोर्टवर खेळून गेले. पण बॅडमिंटनशिवाय क्रिकेट, हॉकी व फुटबॉलची सामग्री वडिलांनी वेळोवेळी पुरवल्यामुळे आमच्या घरी आमच्या सवंगड्यांची गर्दी असायची. पण ह्या खेळात रुचीइतके प्रावीण्य काही मला संपादन करता आले नाही.

क्रिकेटमध्ये मला पुष्कळ रुची उत्पन्न करायला कारणीभूत झाले माझे मोरूमामा. मोरोपंत हुजुरबाजार म्हणजे माझे सख्खे मामा बनारसला गणित शिकायला आले. त्यांना क्रिकेटचे विलक्षण वेड. त्यांनी क्रिकेटची कॉमेंट्री रेडिओवर ऐकायला सुरुवात केली की, मी पण मधून मधून ऐकत असे. ब्रॅडमनचा जमाना संपला होता. वेस्ट इंडीजचे तीन डब्ल्यू.... वॉरेल, वॉलकॉट आणि वीक्स डावांचा डोंगर रचत होते. लिंडवॉल आणि मिलर वेगाने बंपर्स टाकून त्यांनाही चकवू शकत. क्रिकेटमधल्या खुब्या मी मोरूमामांकडून शिकलो.

पण मोरूमामांकडून मला आणखी एक, जास्त महत्त्वाची गोष्ट मिळाली. आमच्या घरी वडिलांनी भिंतींवर फळे लावून घेतले होते. शाळेत फळ्यावर शिक्षकांनी दिलेला पाठ घरी फळ्यावर आम्ही गिरवत असू, पण एक दिवस मोरूमामांनी फळ्यावर एक कूटप्रश्न मांडला आणि वर लिहिले 'Challenge problem to JVN' म्हणजे हा कूटप्रश्न मला आव्हान म्हणून घातला होता.

मी प्रयत्नांती तो सोडवला आणि त्यांची शाबासकी मिळवली. पण ही फक्त सुरुवात होती! यापुढे आव्हानात्मक कूटप्रश्नांची परंपराच त्यांनी सुरू केली. मनोरंजनातून गणित, तसेच आव्हानातून गणित त्यांनी मला कळत नकळत ह्या मार्गाने शिकवले. त्यांची आव्हाने सोडवत सोडवता मी आठवी- नववीचे गणित मागे टाकून दोन-तीन वर्षे पुढची मजल केव्हा आणि कशी गाठली, ते मलाच कळले नाही. गणित हा माझा लहानपणापासून प्रिय विषय राहिला आहे. इतिहास-भूगोलसारख्या रटून पास व्हायच्या विषयांपेक्षा तर्कशास्त्र आणि बिनचूकपणा यांची दुहेरी धार असलेला गणित हा विषय मला सोपा आणि जवळचा वाटे. आजही वाटतो. पण गणित हा विषय गुलाबाच्या फुलाप्रमाणे आहे. त्याला सुंदर रंग आणि मंद सुगंध असतो, पण त्याचबरोबर काटेकोरपणाचे काटे पण!

शाळेत सामान्यपणे गणिताची ओळख त्याच्या विविध छटांतून न होता काटेकोरपणातून होते, म्हणून सर्वसामान्य विद्यार्थी गणिताचे रसग्रहण करू शकत नाही. हा विषय आपल्याला कळणार नाही, अशीच त्याची भावना असते. सुदैवाने मला लहानपणापासूनच वडिलांनी गणिताचे रंजक दर्शन घडवले. इंग्रजीतील गणितरंजनाचे साहित्य त्यांनी माझ्यापुढे ठेवले आणि वेळप्रसंगी त्यातल्या खुब्या समजावून सांगितल्या. शाळेत असताना तीन भागांतले 'बहुरंगी करमणूक' हे पुस्तक मी अधाश्यासारखी वाचले होते. लहानपणी राजेलोकांच्या गोष्टी वाचून मी माझे एक लहानसे प्रमेय पण केले होते. राजपुत्राला आजोबा नसतो. कारण राजपुत्र हा राजाचा मुलगा आणि राजा हा आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतरच राजा झालेला असतो.

गणित म्हणजे निव्वळ आकडेमोड नसून त्याला तार्किक युक्तिवादाचा पाया असतो आणि तोच महत्त्वाचा असतो. युक्तिवादाच्या खुब्यांमध्येच गणिताचे सौष्ठव असते, याची ओळख मला अंधुकशी प्राथमिक शाळेत असताना झाली व प्रत्यंतर मोरूमामांच्या आव्हानात्मक प्रश्नातून मिळाले.

आता एका प्रसंगाचा उल्लेख करून हे माझे पुराण आवरते घेतो. मी दहा-अकरा वर्षांचा आणि माझा भाऊ दोन वर्षांनी लहान.....दोघांना वडिलांनी एक काम सांगितले. डॉ. राधाकृष्णन एका समितीतर्फे विद्यापीठाला भेट देणार होते व त्यांना, समितीच्या सदस्यांना इतर काही निमंत्रितांसह आमच्या घरी जेवायला बोलावले होते. जेवणापूर्वी ही मंडळी बॅडमिंटन कोर्टवर गप्पा मारत बसलेली असताना आम्ही दोघांनी घरातून दसश्लोकी म्हणायची.

'न भूमिर्नतोऽ यं न तेजो न वायुः...' इत्यादी प्रासादिक संस्कृतमध्ये शंकराचार्यांनी रचलेले हे श्लोक आम्ही घरात पुष्कळ वेळा म्हणत असू. पण आता ते न चुकता, न अडखळता व सूर बेसूर न होऊ देता या मोठ्या निमंत्रितांपुढे म्हणायचे होते आणि ऐकणाऱ्यांत डॉ. राधाकृष्णनसारखे संस्कृतचे दर्दी. आम्ही पुष्कळ पूर्वतयारी केली.

## डॉ. राधाकृष्णन यांची शाबासकी

आणि प्रत्यक्ष कार्यक्रम बिनधास्त पार पडला. लांबून श्लोक कानावर पडले, तेव्हा डॉ. राधाकृष्णनना वाटले ग्रामोफोन रेकॉर्ड लावली आहे. 'ह्या श्लोकांची रेकॉर्ड तुम्हाला कुठे मिळाली?' असे त्यांनी विचारले! नंतर त्यांनी व इतर निमंत्रितांनी आमच्या श्लोकगायनाचे कौतुक केले.

